गोवादूत : पणजी – शनिवार, दि. १७ जानेवारी २०१५

### आवडीचे क्षेत्र आणि जिवलग मित्र ठरतात 'यशदीप'

# जो अनुभव मिळवतो, तोच जिंकतो!

## दोडामार्ग महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन : 'गोवादूत'चे संपादक सचिन परब यांचा युवाईला संदेश

**दोडामार्ग, दि. १६ (प्रतिनिधी)**

''आवडीचे क्षेत्र आणि आवडीचे मित्र सोबत असतील तर जीवनात हमखास यश मिळते. स्वतःमधील क्षमता ओळखून ध्येयपूर्तीच्या दिशेने प्रामाणिकपणे वाटचाल करा. नोकरी मिळविण्याच्या उद्देशाने तर सारेच शिक्षण घेतात; मात्र इतरांना नोकरी देण्यासाठी जो आपले आवडीचे क्षेत्र निवडतो, तोच इतिहास घडवतो'', असे प्रतिपादन 'गोवादूत'चे संपादक सचिन परब यांनी येथे केले.

नवनिर्माण शिक्षण संस्थेच्या दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई हळबे महाविद्यालयाचा सांस्कृतिक महोत्सव व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी 'महालक्ष्मी' हॉल मध्ये झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सचिन परब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी संस्था सदस्य सूर्यकांत परमेकर, स्थानिक व्यवस्थापन समिती सदस्य बाबूराव धुरी, विवेकानंद नाईक, उदय पास्ते, महाविद्यालयाचे प्राचार्य व्ही. ए. पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

**पराभवाला घाबरू नका**

यावेळी परब यांनी अत्यंत साध्या सोप्या शब्दांत, निरागस भावनेतून केलेल्या मार्गदर्शनाने उपस्थित विद्यार्थी भारावले. ते म्हणाले, ''केवळ जिंकले त्यांचेच नाही तर जे हरले त्यांचेही आपण कौतुक करतो. मात्र, जे स्पर्धेत सहभागी झाले नाहीत, त्यांचे मात्र आपण अजिबात अभिनंदन करणात नाही, असे ठणकावले. हरण्याला जो घाबरतो तो आयुष्यात कधीच जिंकू शकत नाही. म्हणून स्पर्धेला सामोरे जा. अनुभव घ्या. जीवनात अनुभव महत्त्वाचे आहेत. ज्याच्याकडे अनुभवांची शिदोरी आहे, जो अनुभव मिळवतो तो जिंकतो'', असा संदेश त्यांनी समर्पक उदाहरणे देत उपस्थितांना दिला. तर जीवनात दोस्तीही तितकीच महत्त्वाची असल्याचेही त्यांनी आवर्जून सांगितले.

**इंटरनेटचा प्रभावी वापर**

महाविद्यालयीन तरुणाईशी खास मोबाईलबाबत संवाद साधताना, तुमच्या हातातील मोबाईल अन् त्यामधील इंटरनेट तुम्हाला तुमचे करिअर घडविण्यात कशी मदत करू शकते, याचे अत्यंत प्रभावीपणे त्यांनी विवेचन केले. आज जग अन् जगातील विविध क्षेत्रांतील उपलब्ध अफाट संधी इंटरनेटच्या माध्यमातून एका क्लिकवर उपलब्ध असल्याचे सांगत त्याचा पुरेपूर




गुणवंतांचा गौरव करताना 'गोवादूत'चे संपादक सचिन परब. सोबत विवेक नाईक, भाई परमेकर, बाबुराव धुरी व प्राचार्य पाटील. (छाया : संदीप देसाई)

उपयोग करण्याचे त्यांनी आवाहन केले. आज कुठेही स्वतःला सिद्ध करायचे असेल तर तुमच्याकडील केवळ शैक्षणिक गुणवत्ता वा प्रमाणपत्रे असून चालत नाहीत, तर आपल्यातील क्षमता सिद्ध करून दाखवता आली पाहिजे. म्हणून स्वतःला सिद्ध करण्यासाठी क्षमता ओळखा. यश हमखास मिळेल. येथील तरुणांनी स्वतःला सिद्ध केले तर गोवा राज्यातही अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात, असेही त्यांनी सांगितले. यावेळी विवेक नाईक यांनी नोकरीचा विचार सोडा, असे सांगत तुम्ही नोकरी देणारे बना, असा संदेश विद्यार्थ्यांना दिला. महाविद्यालयाचे प्राचार्य पाटील यांचेही त्यांनी कौतुक केले. बाबूराव धुरी व सूर्यकांत परमेकर यांनीही विचार व्यक्त केले. मान्यवरांचे स्वागत प्राचार्य पाटील यांनी केले. सूत्रसंचालन दिलीप बर्वे यांनी केले. प्रशांत ढेपे यांनी उपस्थितांचे आभार मानले.